## राज्य निवडणूक आयोग

क्र. रानिआ-१०९५/प्र.क्र. ५०६७/९५/परा.
राज्य निवडणूक आयोग,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक २८ जून १९९५

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,
लातूर

**विषय :** ग्रामपंचायतनिवडणूका १९९५
निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी
खर्चाचा हिशेब सादर करणेबाबत

**संदर्भ :** आपले क्र. ९५/ग्रापनि/कावि/सीआर-२०/
दिनांक १९ जून १९९५ चे पत्र

महोदय,

आपले उमरोक्त विषयासंबंधीचे संदर्भाधीन पत्र कृपया पहावे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी ठराविक मुदतीनंतर खर्चाचे विवरणपत्र व शपथपत्र सादर केले तरी ते स्वीकारणयात यावे.

२. ज्या उमेदवारांनी खर्चाचे हिशेब सादर केले नाहीत अशा उमेदवारांस इंडियन पिनल कोड कलम १७१-(आय्) चे अंतर्गत कार्यवाही का करू नये, अशी कारणे दाखवा नोटीस प्रथम देण्यात यावी व नंतर दाखविलेले कारण समाधानकारक नसल्यास फौजदारी खटला दाखल करावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार

आपला

**(र. गो. चिटणीस)**
कक्ष अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रत रवाना :
सर्व जिल्हाधिकारी यांना